**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धीपत्रक**

- **घरोघरी तिरंगा, घरोघरी स्वच्छता अंतर्गत 'RRR ची पाठशाळा' उपक्रमाचा शुभारंभ**

केंद्र शासनाच्या 'स्वच्छ भारत मिशन २.०' या अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत 'घरोघरी तिरंगा, घरोघरी स्वच्छता' अभियानाच्या अनुषंगाने, मिरा भाईंदर मनपा आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली RRR ची पाठशाळा (Reduce, Reuse, Recycle) या नाविन्यपूर्ण उपक्रमाचा शुभारंभ १४ ऑगस्ट २०२५ रोजी स्व. प्रमोद महाजन हॉल येथे करण्यात आला आहे. हा उपक्रम एक महिना चालणार असून, शहरातील 368 शाळांमधील सुमारे 1,34,000 विद्यार्थ्यांना यात सहभागी करून घेण्यात येणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेला स्वच्छ संरक्षण २०२४-२५ अंतर्गत ०३ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या गटात स्वच्छ शहर म्हणून देशात पहिल्या क्रमांकाचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त झाला असून ही पूर्ण मिरा-भाईंदर शहरासाठी अभिमानाची बाब आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका स्वच्छ सुंदर ठेवण्यासाठी विविध उपक्रम राबवित आहे. त्यानुसारच आज RRR ची पाठशाळा हा नावीन्यपूर्ण उपक्रम शालेय विद्यार्थी यांच्यासाठी सुरू करण्यात आला आहे.

RRR ची पाठशाळा हा उपक्रम शहरातील RRR केंद्र व शाळांमध्ये राबविण्यात येणार आहे. नागरिकांकडून संकलित केलेल्या चांगल्या दर्जाच्या वापरलेल्या वस्तू — जसे की कपडे, भांडी, खेळणी, बूट-चप्पल इत्यादी — आकर्षक पद्धतीने या RRR केंद्रात प्रदर्शित करण्यात आले आहेत. यामागचा उद्देश विद्यार्थ्यांना पुनर्वापर संस्कृती, साधनांचा योग्य उपयोग व पर्यावरण संरक्षण याबाबत प्रत्यक्ष अनुभवातून जागरूक करणे हा मुख्य हेतू आहे. याशिवाय, या उपक्रमात महापालिकेमार्फत होत असलेले घरगुती घनकचरा संकलन ते प्रक्रियेपर्यंतच्या संपूर्ण प्रवासाचे थेट प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखविण्यात येत आहे. तसेच शाळेंमध्ये विद्यार्थ्यांना जन जागृतीपर चित्रपट दाखविण्यात येणार आहे. तसेच कचऱ्यापासून तयार होणाऱ्या Waste-to-Art (कच-यापासून कला व उपयुक्त वस्तू निर्मिती) प्रदर्शनाद्वारे 'कचरा म्हणजे संसाधन' हा संदेश दिला जात आहे. आजचे टाकाऊ वस्तू ही उद्याची संपत्ती आहे हा विचार मनावर बिंबवण्यात येत आहे.

विशेषतः प्लास्टिक कचरा व्यवस्थापन यावर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जात असून, एकदा वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकपासून दूर राहणे, पर्यायांचा वापर व प्लास्टिकचे वैज्ञानिक पुनर्वापर याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जात आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सवयी, जबाबदार नागरिकत्व व 'Reduce, Reuse, Recycle' ही जीवनशैली रुजवण्याचा प्रयत्न करीत आहे.